# निशाणी क्रमांक ०५ व २४ वरील आदेश

## ( दिनांक १३ माहे नोव्हेंबर, २०२५ )

वादीने निशाणी ०५ तसेच निशाणी २४ वर शपथपत्रासह प्रतिवादींचे विरुध्द तसेच तुर्तातुर्त मनाई आदेश व अंतरिम मनाई आदेश मिळणेकरीता अनुक्रमे निशाणी ०५ व निशाणी २४ वर अर्ज दाखल केला आहे. वादीने प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत मनाई तसेच अभिलेखावरील तुर्तातुर्त मनाईचा आदेश होईपर्यंत, अंतरिम मनाईसाठी, प्रतिवादीचे विरुध्द त्यांनी दावा मिळकत ही त्रयस्थ इसमास विक्री, तबदिली, हस्तांतर करु नये तसेच कर्ज बोजा निर्माण करु नये, असा आदेश मिळणेकरीता उपरोक्त अर्ज दाखल केले आहेत.

**वादीची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे** :-

**०२**. मौजे आपचुंदा, ता. औसा, जि. लातूर येथील वादील व प्रतिवादी यांची हिंदू एकत्र कुटूंबाची, वादीचे पती नामे वामन हे मयत झाल्यानंतर वारसा आधारे फेर क्र.५०३ अन्वये नोंदविण्यात आलेली वडिलोपार्जित जमीन गट नं.२९४ पोटखराबसह एकुण क्षेत्र ०२ हे. ३४ आर आकार ४ रु.९८ पैसे ज्याची चतु:सिमा खालीलप्रमाणे आहे-

पुर्वेस - संदीपान विश्वनाथ हजारे व राधाबाई गोविंद सुर्यवंशी यांची जमीन.

पश्चिमेस- नेताजी दिगंबर वाघमारे यांची जमीन.

दक्षिणेस - मुगळेवाडी-चलबुर्गा शिवरस्ता.

उत्तरेस- ओढा/नाला,

या मिळकतीस सोयीकरीता **'दावा मिळकत'** असे संबोधण्यात येते.

**०३.** वादीचे कथन असे की, वादी ही दाव्यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांची जन्मदाती आई आहे. वादीचे पती वामन विश्वनाथ हजारे हे सन १९८७ मध्ये मयत झाले आहेत. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटूंबाची वारसा आधारे आलेली वडीलोपार्जीत मिळकत आहे. दावा मिळकतीचा वादी व प्रतिवादी एकत्रीतरीत्या उपभोग घेतात. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दावा मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत. दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक मिळकत असुन वादीचा दावा मिळकतीत दावा मिळकतीत अविभक्त हिस्सा, हक्क व हितसंबंध आहे.

**०४.** वादीने पुढे असे कथन केले की, दावा मिळकतीच्या आजअखेर वाटण्या झालेल्या नाहीत. असे असतानाही प्रतिवादी यांनी तलाठी याचेशी संगनमत करुन ०० हे. ७८ आर अशी नोंद दावा मिळकतीच्या ७/१२ उताऱ्यावर लावलेली आहे. वादीचे नाव हे कोणत्याही कायदेशीर कागदपत्रांशिवाय ७/१२ उताऱ्यावरुन कमी करण्यात आलेले आहे. सदर नोंदीचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी क्र. १ हा कोणत्याही कायदेशीर गरजेविना दावा मिळकतीतील जमीनीपैकी ०० हे. ७८ आर जमीन विक्री करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्यामुळे वादीने गावातील प्रतिष्ठीत पंचांसमक्ष दावा मिळकतीची सरसनिरस मानाने वाटणी करुन द्यावी म्हणुन दिनांक ०५/०३/२०२५ रोजी प्रतिवादींना विनंती केली. परंतु प्रतिवादींनी दावा मिळकतीमधील वाटा वादीस देण्यास नकार दिला. तसेच दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.१ याचे नावे असल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे दावा मिळकत ही त्रयस्थ इसमास विक्री, तबदिली, हस्तांतर करु नये तसेच कर्ज बोजा निर्माण करु नये, असा आदेश मिळणेकरीता वादीने निशाणी ०५ तसेच निशाणी २४ वर मनाई मिळण्याकरीता अर्ज दाखल केले आहेत.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील समन्सची रितसर बजावणी होवुन प्रतिवादी हे प्रस्तत दाव्याकामी हजर झाले आहेत. प्रतिवादी क्र. १ ने निशाणी क्र. ३५ वर कैफियत व सदर कैफियत ही प्रस्तुत अर्जाचे म्हणणे असे समजुन निशाणी ३७ नुसार ते विचारात घेण्याची विनंती केली. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी कैफियत दाखल करुन निशाणी ३२ नुसार वादीचा दावा मान्य केला आहे. तसेच निशाणी ३४ वर पुरसीस देवुन प्रस्तुत अर्जाचे म्हणणे म्हणुन कैफियतीचा विचार करण्यात यावा ही विनंती केली. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वादीची कथने मान्य केली आहेत.

**०६.** प्रतिवादी क्र. १ ने त्यांचा जबाबदावा निशाणी क्र. ३५ वर दाखल करुन वादीच्या दाव्यातील व अर्जातील सर्व कथने नाकारली आहे. प्रतिवादीने कथन केले की, दावा मिळकत ही दाव्याचा विषय होवु शकत नाही. दाव्यास कोणतेही कारण घडलेले नाही. प्रतिवादीने पुढे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावे फेरफार क्र.५०३ नुसार दिनांक ३०/०७/१९८७ रोजी वादी व प्रतिवादींची नावे ७/१२ सदरी नोंद करण्यात आली आहेत. तसेच वादीने त्यांच्या एकत्र कुटूंबाची मिळकत गट क्र.२९५ पैकी ६० आर तसेच गट क्र.२९४ पैकी २० आर आणि गट क्र.२९२ पैकी २२ आर जमीन ही सामाईक जमीन प्रस्तुत दाव्यात समाविष्ट केलेली नाही. सबब, जमीनीमध्ये देखील वादी प्रतिवादी यांचा सामाईक हिस्सा असुन त्या जमीनी दाव्यात घेतल्या नसल्यामुळे सदरचा दावा खारीज करण्यात यावा ही जोरदार विनंती केली. तसेच अभिलेखावरील निशाणी २४ वर वादीतर्फे देण्यात आलेला अर्ज हा बेकायदेशीर असुन दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कोणत्याही तरतुदीनुसार दाखल करण्यात आलेला नसल्यामुळे प्रस्तुत अर्ज हे खर्चासह फेटाळण्याची प्रतिवादी क्र.१ याने विनंती केली आहे.

०७. दोन्ही अर्जावरील कथने व अभिलेखावर दाखल केलेली कागदपत्रे यांचे अवलोकन केले असता, प्रस्तूत अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थितीत झाले. मी त्या मुद्यांना खालीलप्रमाणे त्यापुढे निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी ही तुर्तातुर्त ताकीद आदेश मिळण्यासाठी सकृतदर्शनी दावा त्यांच्या लाभात असल्याचे सिद्ध करते काय? | **अंशतः होकारार्थी** |
| १–अ | वादीने अंतरीम ताकीद आदेश मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी सिद्ध केले आहे काय ? | **होकारार्थी** |
| २ | वादी न्यायाचा/सोयीचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी** |
| ३ | वादी तुर्तातुर्त ताकीद आदेश न मिळाल्यास त्यांचे पैशाच्या स्वरुपात कधीही न भरून येणारे नुकसान होईल असे सिद्ध करतात काय? | **होकारार्थी** |
| ४ | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०८. वादीने आपला दावा शाबीत करण्याकरीता अभिलेखावर कागदोपत्री पुरावा दाखल केला आहे. वादीने खालील कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली आहेत.

| अ.क्र. | कागदपत्रे | निशाणी |
|---|---|---|
| १. | मौजे आपचुंदा येथील गट क्र. २९४ चा ७/१२ उतारा | ४ |
| २. | फेरफार नं. ५०३ मौजे आपचुंदा, ता. औसा | -''- |

| | | |
|---|---|---|
| ३. | वामन विश्वनाथ हजारे याचे मृत्यू प्रमाणपत्र दाखला | -''- |
| ४. | वादीचे आधारकार्ड | -''- |
| ५. | वादीने दुय्यम निबंधक औसा यांना दिलेला तक्रार अर्ज. | -''- |
| ६. | खरेदीखत क्र.१५००/२०२५ ची प्रत | १४ |
| ७. | दिवाणी दावा क्र.३७८/२०२५ मधील दावा व त्यावरील आदेश | २१ |
| ८. | दिवाणी दावा क्र.३७८/२०२५ मधील हुकूमनाम्याची प्रत | -''- |

प्रतिवादी क्र.१ याने अभिलेखावर त्याची कैफियत तसेच अर्जास म्हणणे दाखल केले. प्रतिवादी क्र.१ याने खालीलप्रमाणे अभिलेखावर कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | कागदपत्रे | निशाणी |
|---|---|---|
| १. | खाते क्र.५३ चा शेतीचा ८/अ चा उतारा | ३९ |
| २. | मौजे आपचुंदा येथील गट क्र. २९५ चा ७/१२ उतारा | -''- |
| ३. | मौजे आपचुंदा येथील गट क्र. २९२ चा ७/१२ उतारा | -''- |
| ४. | फेरफार नं. ६८८ मौजे आपचुंदा, ता. औसा | -''- |
| ५. | फेरफार नं. ३६८ मौजे आपचुंदा, ता. औसा | -''- |

वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम.पी. शेख, प्रतिवादी क्र. १ तर्फे श्री. पी.एन.काळदाते व प्रतिवादी क्र. २ –३ तर्फे श्री. कुसुमकर यांचा युक्तिवाद ऐकला.

**मुद्दा क्रमांक ०१ बाबत –**

०९. वादीने दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटूंबाची वारसा आधारे आलेली वडीलोपार्जीत मिळकत असुन दावा मिळकतीचा वादी व प्रतिवादी एकत्रीतरीत्या उपभोग घेतात, असे कथन केले आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दावा मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत. दावा

मिळकत ही वादी व प्रतिवादी यांची सामाईक मिळकत असुन वादीचा दावा मिळकतीत दावा मिळकतीत अविभक्त हिस्सा, हक्क व हितसंबंध असल्याची बाब शाबीत करण्याकरीता वादीतर्फे दावा मिळकतीचा ७/१२ उतारा तसेच फेरफार नं. ५०३ मौजे आपचुंदा, ता. औसा चा उतारा दाखल केला आहे. अभिलेखावर दाखल निशाणी ०४ सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी ही प्रतिवादी यांची आई आहे. तसेच फेरफार नं. ५०३ मौजे आपचुंदा चे अवलोकन करता, वादीचे पती वामन विश्वनाथ हजारे मयत झाले असुन त्यांना तीन मुले माधव वामन हजारे, किशोर वामन हजारे व दत्तात्रय वामन हजारे आहेत. तसेच सर्वे क्र.८१ व ८२ मधील वामन विश्वनाथ हजारे यांचे नाव कमी करुन वारसांनी माधव वामन हजारे, किशोर वामन हजारे व दत्तात्रय वामन हजारे यांची अज्ञान पालनकर्ता (अ.पा.क.) गोपाबाई वामन हजारे अशी मालकी हक्कात नोंद घेण्यासाठी अर्ज केल्याचे दिसुन येते. सबब, फेरफार क्र. ५०३ अन्वये प्रतिवादींची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ सदरी सन १९८७ पासुन नोंद झाली आहेत. यावरुन असे निदर्शनास येते की, दावा मिळकत ही पुर्वी वादी व प्रतिवादी यांचे पुर्वहक्कदार वामन विश्वनाथ हजारे यांचे नावे होती. सदर वामन विश्वनाथ हजारे याचे मृत्यू नंतर दावा मिळकतीच्या सदरी प्रतिवादी यांची नावे नोंदण्यात आल्याचे निष्पन्न होते. तसेच प्रतिवादी माधव वामन हजारे याने त्याच्या कैफियत निशाणी ३५ वर सदर बाबीस दुजोरा देवुन प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे नावे प्रत्येकी ०० हे. ७८ आर जमीन फेरफार क्र.५०३ ने दिनांक ३०/०७/१९८७ रोजी मंजूर झाले असल्याची बाब मान्य केली आहे. तसेच सदर फेरफार क्र.५०३ हा आजही कायम असुन त्याचे विरुध्द कोठेही अपील केले नसल्याचे मान्य केले आहे. तसेच प्रतिवादीने कथन केले की, वादी व प्रतिवादी यांनी वडीलोपार्जीत जमीनीतुन उत्पन्न घेवुन मेहनत मशागत करुन इतर जमीन मिळकती एकत्रीतरीत्या खरेदी केलेल्या आहेत.

१०. उलटपक्षी प्रतिवादी माधव याने त्याचे जबाबदाव्यामध्ये दावा मिळकत ही त्याची स्वकष्टार्जीत मिळकत असल्याविषयी कोणतीही परिस्थिती अभिलेखावर आणलेली नाही अथवा तशी कोणतीही ठोस कागदपत्रे अभिलेखावर दाखल केली नाहीत. तसेच वादी व प्रतिवादी यांचेतील नातेसंबंध याबाबत देखील वाद नाही. अशा परिस्थीतीमध्ये दावा मिळकत गट क्र.२९४ मधील मिळकतींमध्ये वादी व प्रतिवादी यांचे सामाईक हक्क व हितसंबंध असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. त्यामुळे प्रथमदर्शनी विचार करता, वादींचा देखील दावा मिळकतींमधील हक्क व हितसंबंध नाकारता येणार नाही. सदर बाब ही प्रकरणातील पुरावा नोंद केल्यानंतर संपुर्णपणे निष्पन्न होईल, परंतू सकृतदर्शनी दावा मिळकतीमध्ये वादींचा हक्क व हितसंबंध असल्याबाबत वाद नाही. सबब **मुद्दा क्रमांक ०१** चा निष्कर्ष **अंशतः होकारार्थी** नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्रमांक ०१–अ बाबत –**

११. वादीने निशाणी ०५ च्या अर्जामध्ये प्रतिवादी याचे विरुध्द कायम स्वरुपी तुर्तातुर्त मनाई मिळणेकरीता अर्ज दाखल केला आहे. तसेच सदर अर्जावर वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे व युक्तीवाद याकरीता विलंब होणार असल्याने अंतरीम मनाई आदेश मिळण्याकरीता, निशाणी ०५ वरील तुर्तातुर्त मनाई अर्जावरील आदेश होईपर्यंत अंतरीम स्थगितीसाठी निशाणी २४ वर वेगळा अंतरीम ताकीद आदेश मिळणेची मागणी केली आहे. परंतु प्रस्तुत अर्जातील मागणी ही मुळ अर्जाच्या आदेशाचाच एक भाग आहे. सबब, **मुद्दा क्रमांक ०१–अ** चा निष्कर्ष **होकारार्थी** नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्रमांक ०२ बाबत –**

१२. वादीने दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या हिंदू एकत्र कुटूंबाची वारसा आधारे आलेली वडीलोपार्जीत मिळकत असुन दावा मिळकतीचा

वादी व प्रतिवादी एकत्रीतरीत्या उपभोग घेत असुन सदर दावा मिळकतीच्या वाटण्या झालेल्या नाहीत, असे नमुद केले आहे. सदर वादीचे म्हणणे प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी मान्य केले आहे. तसेच प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.१ याने देखील त्याच्या निशाणी ३५ वरील कैफियतीमधील सत्य परिस्थिती सदराखालील परिच्छेद क्र.१ मध्ये मान्य केले आहे की, दावा मिळकतीवर प्रत्येकी ०० हे. ७८ आर जमीन ही प्रतिवादींच्या नावाने असुन ती जमीन फेरफार क्र.५०३ ने दिनांक ३०/०७/१९८७ रोजी मंजूर झाली असुन तो फेरफार क्र.५०३ आजही कायम आहे. त्या फेरफाराच्याविरुध्द कोठेही अपील केलेले नाही. परंतु सदर प्रतिवादी याने दाव्यात नमुद केलेली दावा मिळकत ही त्याची स्वकष्टार्जीत अथवा त्याच्या स्वतःच्या मालकीची असल्याबाबत कोणतेही कथन अथवा उल्लेख केलेला नसल्याचे दिसुन येते. सबब, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादींच्या पुर्वहक्कदार नामे वामन हजारे यांचे मृत्यूनंतर फेरफार क्र.५०३ नुसार वारसांच्या नावे नोंद झाली असल्याचे दिसुन येते. त्यामुळे दावा मिळकतीत वादी व प्रतिवादी यांचे हक्क व हितसंबंध असल्याचे निदर्शनास येते. तसेच वादीने नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी याने पुर्वी त्याच्या नावाने नोंद असलेल्या जमीनीपैकी दावा मिळकतीतील काही क्षेत्र हे खरेदीखत क्र.१५००/२०२५ अन्वये विक्री केल्याचे देखील अभिलेखावर निष्पन्न झाले आहे. तसेच दावा मिळकतीतील उर्वरीत क्षेत्र हे त्रयस्थ इसमास विक्री, तबदिली, हस्तांतर केल्यास अथवा त्याचेवर कर्ज बोजा निर्माण करु केल्यास वादीचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदर बाब वादीने देखील प्रतिज्ञापत्रावर नमुद करुन प्रतिवादी हे त्यांच्या नावाने असलेल्या मिळकतीतील क्षेत्र हे वादीच्या अपरोक्ष विक्री किंवा हस्तांतरण करण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून न्यायाचा तराजु वादींच्या हक्कात झुकत प्रथमदर्शनी दिसून येते. म्हणून **मुद्दा क्रमांक ०२** चे निष्कर्ष **होकारार्थी** नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्रमांक ०३ बाबत –**

**१३.** अभिलेखावरील दावा, कैफियत तसेच कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दावा मिळकतीच्या ७/१२ वर प्रत्येकी ०० हे. ७८ आर जमीन ही प्रतिवादींच्या नावाने असुन ती जमीन फेरफार क्र.५०३ ने दिनांक ३०/०७/१९८७ रोजी मंजूर झाली असुन तो फेरफार क्र.५०३ आजही कायम आहे. त्या फेरफाराच्याविरुध्द कोठेही अपील केलेले नाही. तसेच प्रतिवादी यांनी पुर्वी काही क्षेत्र इतरांची संमती नसतानाही विक्री केलेले आहे. सबब, अशा परिस्थितीमध्ये वादीचा अर्ज मंजूर न केल्यास वादीचे पैशांच्या स्वरुपात न भरुन येणारे कोणतेही नुकसान होणार आहे. उलटपक्षी प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. वादीचा अर्ज नामंजूर केल्यास तिला तिच्या हक्क व हितसंबंधांना मुकावे लागणार असून पैशांच्या स्वरूपात कधीही न भरुन येणारे नुकसान संभवत आहे. सबब, **मुद्दा क्रमांक ०३** चे निष्कर्ष **होकारार्थी** नोंदविण्यात येतो.

**मुद्दा क्रमांक ०४ बाबत –**

**१४.** वादीने अभिलेखावर शपथपत्रासह, प्रतिवादींचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई आदेश व अंतरिम मनाई आदेश मिळणेकरीता अनुक्रमे निशाणी ०५ व निशाणी २४ वर अर्ज दाखल केले आहेत. वादीने प्रस्तुत दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यत मनाई तसेच अभिलेखावरील तुर्तातुर्त मनाईचा आदेश होईपर्यंत, अंतरिम मनाईसाठी, दावा मिळकत ही प्रतिवादींनी त्रयस्थ इसमास विक्री, तबदिली, हस्तांतर करु नये तसेच कर्ज बोजा निर्माण करु नये म्हणुन दाखल केला आहे. अशा परिस्थितीमध्ये उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ३ च्या विवेचनावरुन तसेच निष्कर्षावरुन वादीतर्फे उपरोक्त मनाई हुकूम मिळण्याकरीता आवश्यक असलेले सर्व घटक सिध्द करण्यात वादी प्रथमदर्शनी यशस्वी झाली असल्याचे दिसुन

आले. सबब, उपरोक्त मुद्दा क्र.१ ते ३ च्या विवेचनावरुन तसेच निष्कर्षावरुन, **मुद्दा क्रमांक ०४** च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करण्यात येतो;

# आदेश

| | |
|---|---|
| १. | वादीचा अर्ज (निशाणी ०५) अंशतः मंजूर करण्यात येतो. |
| २. | वादीचा अर्ज (निशाणी २४) मंजूर करण्यात येतो |
| ३. | प्रतिवादींनी दाव्याचा निकाल होईपर्यत दावा मिळकत ही त्रयस्थ इसमास विक्री करु नये तसेच कर्ज बोजा निर्माण करु नये असा तुर्तातुर्त मनाईचा हुकूम देण्यात येत आहे. |
| ४. | खर्चाबाबत आदेश नाही. |

*(खुल्या न्यायालयात अधिघोषित.)*

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PARAG PHADNIS AWATE
Date: 2025.11.14 15:00:31 +0530

**दिनांक – १३/११/२०२५** **(श्री. आवटे पी. पी. )**

**ठिकाण – औसा.** **सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, औसा.**